# प्रेसनोट

दि. १३/०४/२०२३

ग्रामपंचायत खडकाळे, कामशेत, ता. मावळ, जि. पुणे येथील ग्रामविकास अधिका-यावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | कामशेत पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७. |
| तक्रारदार | पुरूष, वय - २८ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | विलास तुकाराम काळे, वय ४६ वर्ष, ग्रामविकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत खडकाळे, कामशेत, ता. मावळ, जि. पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १२,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १०,०००/- रुपये |
| पडताळणी दिनांक | १३/०४/२०२३ |
| सापळा दिनांक | १३/०४/२०२३ |

ठिकाण :- ग्रुप ग्रामपंचायत खडकाळे, कामशेत, ता. मावळ, जि. पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यानी त्यांचे आईचे नावावर खरेदी केलेल्या जागेवर पत्र्याचे शेडची नोंद ग्रामपंचायत खडकाळे - कामशेत येथे करण्यासाठी ग्रामविकास अधिकारी लोकसेवक विलास काळे यांची भेट घेतली. लोकसेवक विलास काळे यानी ८ अ उता-यावर नोंद करण्यासाठी १२,०००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांचे आईचे नावे नोंद करुन देण्यासाठी ग्रामविकास अधिकारी विलास काळे यानी तक्रारदारांकडे १०,०००/- रुपयांची (दहा हजार) लाच मागणी करुन, ती रक्कम स्वीकारल्यावर त्याना ताब्यात घेण्यात आले असून, कामशेत पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.